# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः20.07.2024** **वारःशनिवार**

---

1. मायक्रोसॉफ्ट सॉफ्टवेअरमधील तांत्रिक बिघाडामुळे जगभरातील अनेक यंत्रणा ठप्प मात्र, राष्ट्रीय माहिती संस्थेचं काम सुरळीत सुरू
2. केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयाचं 100 अब्ज डॉलर्सच्या निर्यातीचं उद्दिष्ट असल्याचं केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीजा सिंह यांचं प्रतिपादन
3. महिलांच्या 20 षटकांच्या आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेत भारतीय महिलांची पाकिस्तान संघावर मात आणि
4. गुजरात, कोकण, गोवा आणि कर्नाटक किनारपट्टीवर अतीवृष्टीचा हवामान विभागाचा इशारा

**<u>मायक्रोसॉफ्ट बिघाड</u>**

मायक्रोसॉफ्ट सॉफ्टवेअरच्या प्रणालीत काल झालेला तांत्रिक बिघाड हळूहळू सोडवण्यात येत आहे, मात्र, सर्व यंत्रणा सुरळीत होण्यास आणखी काही वेळ लागेल असं मायक्रोसॉफ्टची सहयोगी कंपनी असलेल्या क्राउडस्ट्राइक या कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे.

मायक्रोसॉफ्ट सॉफ्टवेअरच्या प्रणालीत काल तांत्रिक बिघाड झाला आणि बघता बघता सगळं जग जणू ठप्प झालं. या तांत्रिक बिघाडाचा अर्थात आऊटेजचा जगभरातील करोडो वापरकर्त्यांना तसंच बँकिंग सेवा, रुग्णालयं आणि विमान वाहतूक यंत्रणेला सर्वात जास्त फटका बसला. देशभरातील अनेक विमान कंपन्यांना विमानतळांवर मॅन्युअल चेक-इन आणि बोर्डिंग प्रक्रियेचा अवलंब करावा लागला.

यूएस सायबर-सुरक्षा फर्म क्राउडस्ट्राइकने सदोष सॉफ्टवेअर अपडेट जारी केल्यानंतर मायक्रोसॉफ्ट विंडोजच्या ऑपरेटिंग सिस्टमवर परिणाम झाला आणि जगभरातील अनेक उपकरणं आणि प्रणाली अकार्यक्षम झाली. सुरक्षेसंदर्भातली माहिती गोळा करण्यासाठी अनेक व्यावसायिक संगणकांमधे फाल्कन सेन्सर बसवल्यामुळे ही समस्या निर्माण झाली असून ती सोडवण्यासाठी अभियंते प्रयत्नशील असल्याचं कंपनीनं सांगितलं.

दरम्यान, जागतिक आउटेजबाबत सरकार मायक्रोसॉफ्टशी संपर्कात असून या बिघाडामागचं कारण सापडल्याची माहिती, केंद्रीय माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी समाजमाध्यमावर दिली आहे. तथापि, राष्ट्रीय माहिती केंद्राच्या नेटवर्कवर या बिघाडाचा परिणाम झाला नसल्याचं वैष्णव यांनी नमूद केलं आहे.

**<u>वस्त्र-निर्यात</u>**

केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयाने 100 अब्ज डॉलर्सच्या निर्यातीचं उद्दिष्ट ठेवलं असल्याचं, केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीजा सिंह यांनी म्हटलं आहे. काल पाटणा इथे वस्त्रोद्योग गुंतवणूकदारांच्या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी ते बोलत होते.

सध्या या क्षेत्रात असलेली 176 अब्ज डॉलर्सची उलाढाल 350 अब्ज डॉलर्सपर्यन्त वाढवण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं त्यांनी सांगितलं. बिहारसारख्या राज्यात वस्त्रोद्योग क्षेत्राला मोठी संधी असल्याचं ते म्हणाले. बेतिया आणि मुझफ्फरपूरसोबत, राज्यात बेगुसराय हा तिसरा क्लस्टर विकसित केला जाईल असं आश्वासन सिंह यांनी यावेळी दिलं.

**पोस्ट राखी**

राखी पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर, आपल्या प्रियजनांना राख्या वेळेवर मिळाव्यात या दृष्टीने भारतीय टपाल खात्यानं 31 जुलै पर्यंतच राख्या पाठवण्याचं नियोजन करण्याचा सल्ला नागरिकांना दिला आहे. राख्यांचं संभाव्य नुकसान टाळण्यासाठी राख्या असलेली आपली पाकिटे सुरक्षितपणे बंद करणे आवश्यक असून पाकिटावर योग्य पिनकोडसह योग्य पत्ता लिहिणं गरजेचं आहे. याशिवाय आपला मोबाईल क्रमांकही नमूद करण्याचा सल्ला टपाल विभागानं दिला आहे. सीमाशुल्क प्रक्रिया जलद पूर्ण करण्यासाठी पाकिटातून पाठवलेल्या गोष्टी घोषणा पत्राद्वारे अचूकपणे जाहीर करणे गरजेचं आहे. तसंच ज्वलनशील पदार्थ, द्रव किंवा नाशवंत अशा प्रतिबंधित गोष्टी पाठवू नयेत कारण अशा वस्तु जप्त केल्या जाऊ शकतात.

**संरक्षण पुरस्कार-राष्ट्रपती**

नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवनात काल संरक्षण गौरव समारंभ संपन्न झाला. या समारंभात, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते भारतीय सशस्त्र दल आणि भारतीय तटरक्षक दलातील सेवारत आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना 94 विशिष्ट सेवा पुरस्कार प्रदान करण्यात आले. यात 31 जणांना परम विशिष्ट सेवा पदकं, 4 जणांना उत्तम युद्ध सेवा पदकं, 57 जणांना अति विशिष्ट सेवा पदकं तर दोघांना पुन्हा एकदा अतिविशिष्ट सेवा पदकं बहाल करण्यात आली. या समारंभाला केंद्रीय  संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, परराष्ट्रव्यवहार मंत्री एस. जयशंकर आणि दिल्लीचे नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना उपस्थित होते.

**बांग्लादेश-विद्यार्थी**

बांगलादेशात उसळलेल्या आरक्षणविरोधी दंगलींच्या पार्श्वभूमीवर बांगलादेशातील भारतीय नागरिकांनी आणि विद्यार्थ्यांनी, ढाका मधील भारतीय उच्चायुक्तांनी गुरुवारी जारी केलेल्या सूचनांचे पालन करण्याचं आणि उच्चायुक्तांच्या संपर्कात राहण्याचं आवाहन केंद्रीय परराष्ट्र मंत्रालयानं केलं आहे. कोणत्याही प्रकारच्या मदतीसाठी ढाक्यातलं भारतीय उच्चायुक्तालय आणि सहाय्यक उच्चायुक्तालयं हेल्पलाइन नंबरवर उपलब्ध असून, परराष्ट्र मंत्रालय तेथील भारतीय विद्यार्थी आणि नागरिकांना सर्वतोपरी मदत करण्यासाठी कटिबद्ध असल्याचं, मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी काल सांगितलं.

**विश्व-वारसा अधिवेशन**

जागतिक वारसा समितीचं 46 वं अधिवेशन उद्यापासून 31 जुलैपर्यंत नवी दिल्लीतील भारत मंडपम इथे होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या या अधिवेशनाचं उद्घाटन होणार आहे. भारत पहिल्यांदाच या अधिवेशनाचं यजमानपद भूषवत आहे.

**ओलावा-मापकयंत्र**

तृणधान्य आणि तेलबियांमधील आर्द्रता पातळी मोजण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या आर्द्रता मापकाच्या नियमांसंदर्भात सरकारने सर्व संबंधितांशी चर्चा केली आहे. ग्राहक व्यवहार विभागाच्या सचिव निधी खरे यांच्या अध्यक्षतेखाली यासंदर्भात काल नवी दिल्लीत बैठक घेण्यात आली. विविध पदार्थांमधील, विशेषतः तृणधान्ये आणि

तेलबिया यांच्यातील आर्द्रता मोजण्यासाठी आर्द्रता मापक वापरण्यात येतं. हे मापक, गुणवत्ता आणि साठवण योग्यता निर्धारित करण्यासाठी महत्वाची भूमिका बजावतं.

**केन-बेतवा जोड प्रकल्प**

केन आणि बेतवा नदीजोड प्रकल्पासाठी भूसंपादनाची कामं जलद गतीने पूर्ण करण्याचे तसंच सर्व प्रलंबित प्रकल्प अहवाल जलदगतीने पूर्ण करण्याचे निर्देश केंद्र सरकारने उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश सरकाराला दिले आहेत. या नदीजोड प्रकल्पात मध्य प्रदेशातील केन नदीचं पाणी उत्तर प्रदेशातील बेतवा नदीपर्यंत नेण्याचं प्रस्तावित आहे. या प्रकल्पाद्वारे बुंदेलखंड प्रदेशाला सिंचनासाठी पाणीपुरवठा केला जाणार आहे.

**RBI दंड**

ग्राहकांच्या KYC माहितीच्या 2016 च्या निर्देशांचं पालन न केल्याबद्दल रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अर्थात आरबीआयने मुथूट फायनान्स लिमिटेड कंपनीला 1 लाख 90 हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. दिलेल्या निर्देशांचं पालन करण्यात कंपनी अपयशी ठरल्याबद्दल कंपनीला दंड का करू नये असं आरबीआयने कारणे दाखवा नोटीशीत म्हटलं आहे.

**महिला क्रिकेट**

महिलांच्या 20 षटकांच्या आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेत, काल भारतीय संघानं पाकिस्तानचा सात गडी राखून पराभव केला. भारतीय संघानं 7 गडी आणि 35 चेंडू राखून 109 धावांचं लक्ष्य पूर्ण केलं. सलामीवीर स्मृती मन्धनाच्या 45 आणि शेफाली वर्माच्या 40 धावांनी भारताच्या धावसंख्येत मोलाचं योगदान दिलं. तत्पूर्वी, प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानच्या संघाने 19 षटकं आणि 2 चेंडूत, सर्वगडी बाद, 108 धावा केल्या. दीप्ती शर्मानं 3 तर रेणुका सिंग, पूजा वस्त्राकर आणि श्रेयंका पाटील यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. दीप्ती शर्माला सामनावीर म्हणून गौरवण्यात आलं. या स्पर्धेत, आज भारताचा सामना संयुक्त अरब अमिराती विरुद्ध होणार आहे.

**हवामान**

भारतीय हवामान खात्याने आज गुजरात, कोकण, गोवा, कर्नाटक किनारपट्टी आणि कर्नाटकच्या दक्षिणेकडील अंतर्गत भागात अतिवृष्टीचा अंदाज वर्तवला आहे. केरळ, तेलंगणा, किनारी आंध्र प्रदेश, ओडिशा, विदर्भ, छत्तीसगड आणि मध्य प्रदेश मध्ये मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसंच मध्य महाराष्ट्र आणि कर्नाटकच्या दक्षिणेकडील अंतर्गत भागात आगामी 4 दिवसांत मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडेल, असा अंदाज आहे. दरम्यान, आज झारखंड आणि पश्चिम बंगालमध्ये गंगेच्या प्रदेशात आणि हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, हरियाणा, पूर्व राजस्थान आणि कर्नाटकाच्या उत्तर अंतर्गत भागात पुढील 4 दिवसांत मुसळधार पाऊस असेल. आगामी 3-4 दिवसांत नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, अरुणाचल प्रदेश, आसाम आणि मेघालय इथेही अशीच परिस्थिती राहील, असं हवामान संस्थेनं म्हटलं आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.